## निशाणी क्र. ०५ वरील आदेश

१. अर्जदारांनी सदरचा अर्ज अंतरिम पोटगी, घरभाडे व नुकसान भरपाई मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. अर्जदार क्र. १ ने तिच्या अर्जामध्ये असे कथन केले आहे की, अर्जदार क्र. १ व गैरअर्जदार क्र. १ यांचे लग्न दिनांक १६/०४/२०१६ रोजी झाले. गैरअर्जदार क्र. १ ही अर्जदार क्र. १ ची सासु असुन गैरअर्जदार क्र. ३ ही जाउ आहे. लग्नानंतर अर्जदार क्र. १ ही गैरअर्जदारांच्या संयुक्त कुटूंबात घरी राहायला गेली. लग्नानंतर १० दिवस गैरअर्जदारांनी अर्जदार क्र. १ ला चांगले वागविले. त्यानंतर गैरअर्जदार क्र. १ हा दारु पिवुन येवु लागला आणि अर्जदार क्र. १ ला शिवीगाळ व मारहाण करु लागला आणि माहेरुन ५० हजार रुपये घेवुन ये असा तगाद लावुन लागला. परंतु अर्जदार क्र. १ च्या माहेरची परिस्थीती गरीबीची असल्यामुळे ती त्रास सहण करीत राहीली.

३. गैरअर्जदार क्र. १ ने लग्नांनतर १ महीन्यांनी दारुच्या नशेत रात्रीच्या वेळी अर्जदार क्र. १ ला मारहाण करुन घराबाहेर हकलुन दिले. गैरअर्जदार क्र. १ आणि गैरअर्जदार क्र. ३ यांचे प्रेम संबंध असल्यामुळे लग्नानंतर त्यांनी अर्जदार क्र. १ ला मानसिक त्रास देणे सुरु केले. गैरअर्जदार क्र. २ व ३ हे अर्जदार क्र. १ ला म्हणत होते की, ''तुला जर हया घरात राहायचे असेल तर तू तुझ्या माहेरुन ५० हजार रुपये आण नाही तर तुला या घरात राहु देत नाही''. तसेच गैरअर्जदार क्र. २ व ३ हे गैरअर्जदार क्र. १ ला अर्जदार क्र. १ विषयी खोटी माहिती सांगत होते त्यावरुन गैरअर्जदार क्र. १ हा रात्री नशेत अर्जदार क्र. १ ला मारहाण करीत होता. त्यानंतर अर्जदार क्र. १ ला गर्भधारणा झाली.

४. गैरअर्जदारांकडुन अर्जदार क्र. १ ला होणारा त्रास असहय झाल्यामुळे तिने नाईलाजास्तव पांढुर्णा येथील महिला दक्षता विभाग यांच्याकडे तक्रार दाखल केली त्यावेळी गैरअर्जदारांनी अर्जदार क्र. १ हिची माफी मागून चांगल्या वर्तणुकीची हमी दिली आणि आपसी समझोता केला परंतु त्यानंतर देखील गैरअर्जदारांचा त्रास सुरुच राहीला. गैरअर्जदारांनी अर्जदार क्र. १ च्या डिलेव्हरीचा खर्च देण्यास नकार दिला आणि तिला डिलेव्हरी करीता तिच्या माहेरी जाण्याचा तगादा लावला. त्यानंतर अर्जदार क्र. १ डिलेव्हरीसाठी माहेरी आली. तेव्हापासुन गैरअर्जदारांनी अर्जदार क्र. १ ची कोणतीही चौकशी केली नाही आणि आर्थिक मदत केली नाही.

५. अर्जदार क्र. १ ने दि. ३०/०७/२०१७ रोजी अर्जदार क्र. २ ला जन्म दिला. सदरची माहिती गैरअर्जदारांना फोनद्वारे दिली असता गैरअर्जदार क्र. १ फोनवर म्हणाला की, ''माझे बाळ नाही त्यामुळे मला काहीही करावे लागत नाही''. त्यानंतर गैरअर्जदार हे बारशाच्या कार्यक्रमात देखील आले नाही. अर्जदार क्र. १ ने डिलेव्हरीनंतर २ महिन्यांनी गैरअर्जदार क्र. १ ला घेऊन जाण्याकरीता बोलाविले परंतु त्याने अर्जदार क्र. १ ला घेवुन जाण्यास नकार दिला.

६. अर्जदार क्र. १ ही अर्जदार क्र. २ ला घेवुन दि. १८/०८/२०१८ रोजी गैरअर्जदारांच्या घरी गेली असता त्यांनी अर्जदारांना घरात येण्यास मनाई केली. उलट अर्जदारांना धमकी दिली की, ''तू घरात आली तर तुला मारुन टाकीन''. त्यामुळे अर्जदार हे माहेरी परत आली तेव्हापासुन ती तिच्या माहेरी राहत आहे.

७. गैरअर्जदार क्र. १ ने अर्जदार क्र. १ चा पुर्णपणे त्याग केला आहे त्यामुळे अर्जदार क्र. १ ने दि. ०४/०४/२०१९ रोजी घाटोळे वकीलामार्फत नोटीस पाठवुन अर्जदारांना घेवुन जाण्याबाबत आणि चांगली वर्तणुकीची हमी देण्याबाबत कळविले. सदरची नोटीस गैरअर्जदारांना दि. २०/०४/२०१९रोजी मिळाली परंतु गैरअर्जदार हे अर्जदार क्र. १ ला नांदण्यासाठी नेले नाही किंवा नोटीसला उत्तर दिले नाही.

८. अर्जदारांकडे उत्पन्नाचे साधन नाही. याउलट गैरअर्जदार क्र. १ हा टाईल्स फिंटीग च्या ठेकेदारीचे काम करतो त्यापासुन त्याला दरमहा ३० हजार रुपये उत्पन्न मिळते तसेच गैरअर्जदारांकडे १३ एकर शेती असुन त्यापासुन त्यांना वार्षिक ५ लाख रुपये उत्पन्न् मिळते. गैरअर्जदारांकडे स्वतःचे राहत घर आहे. गैरअर्जदार क्र. १ वर अर्जदारांव्यतिरिक्त इतर कोणीही अवलंबुन नाही. गैरअर्जदार क्र. १ हा अर्जदारांना पोटगी देवु शकते म्हणुन अर्जदार क्र. १ ने सदरचा अर्ज दाखल केला आहे.

९. गैरअर्जदार क्र. १ ने नि. क्र. ११ वर त्याचे अंतरीम अर्जावरील म्हणणे दाखल केले आहे. त्याने त्याच्या म्हणण्यामध्ये अर्जदार क्र. १ आणि गैरअर्जदार क्र. १ हे पती–पत्नी असल्याचे कबुल केले असुन दिनांक १६/०४/२०१६ रोजी त्यांचे लग्न झाले असल्याचे देखील कबुल केले आहे.

१०. गैरअर्जदार क्र. १ ने त्याच्या म्हणण्यामध्ये त्याने अर्जदार क्र. १ ला मारहाण केल्याचे आणि शिवीगाळ केल्याचे नाकारले. तसेच तिला माहेरुन रुपये ५० हजार आणण्यासाठी तगादा लावल्याचे नाकारले तसेच सोडचिठ्ठी मागितल्याचे नाकारले. तसेच त्याने अर्जदार क्र. १ ला शारिरीक आणि मानसिक त्रास दिल्याचे नाकारले. गैरअर्जदारांनी

त्यांच्या म्हणण्यामध्ये अर्जदार क्र. १ ही तिच्या माहेरच्या लोकांच्या दयेवर जगत असल्याचे नाकारले तसेच तिला उत्पन्नाचे साधन नसल्याचे नाकारले.

११. गैरअर्जदार क्र. १ त्याच्या म्हणण्यामध्ये त्याची आर्थिक परिस्थीती चांगली असल्याचे नाकारले तसेच तो टाईल्स फिटींगचा व्यवसाय करीत असल्याचे नाकारले. तसेच त्यातुन त्याला दरमहा रुपये ३० हजार उत्पन्न मिळत असल्याचे नाकारले तसेच त्याच्याकडे १३ एकर शेत जमिन असल्याचे आणि त्यातुन दरवर्षी ५ लाख रुपये उत्पन्न मिळत असल्याचे नाकारले. तसेच त्याच्यावर कोणी अवलंबुन असल्याचे नाकारले. तसेच त्याने अर्जातील मागण्या नाकारल्या.

१२. अर्जदार क्र. १ ने तिच्या अर्जामध्ये असे कथन केले आहे की, लग्नानंतर अर्जदार क्र. १ ही संयुक्त कुटूंबात केवळ ३ दिवस राहीली आणि गैरअर्जदार क्र. १ बरोबर ती वेगळी राहत होती. अर्जदार क्र. १ ही स्वयपांक वेळेवर करीत नव्हती. ती कपडे बरोबर धुवत नव्हती. त्यामुळे गैरअर्जदार क्र. १ ला उपाशी मजुरीसाठी जावे लागत होते.

१३. गैरअर्जदार क्र. १ हा मजुरी करतो. त्याला कधीही रुपये १०० तर कधी रुपये १५०/– मजुरी मिळते. कधी कधी त्याला काम मिळत नाही. याउलट अर्जदार क्र. १ ही शिलाईचे काम करते तिला रुपये ३०० मजुरी मिळते. अर्जदार क्र. १ ही कधीही सलग १५ दिवस गैरअर्जदार क्र. १ बरोबर राहीली नाही. अर्जदार क्र. १ ही ३–४ दिवस गैरअर्जदार क्र. १ कडे आणि १५ दिवस तिच्या माहेरी राहत होती.

१४. अर्जदार क्र. १ ही गैरअर्जदार क्र. १ ला म्हणत होती की, 'तु मला पसंत नाही, माझ्या आई–वडीलांच्या सांगण्यावरुन मी तुझ्याशी लग्न केले, मला तुझ्याशी संसार

करायचा नाही'. अर्जदार क्र. १ ही तिच्या आई–वडीलांच्या सांगण्यानुसार वागत होती. गैरअर्जदार क्र. १ हा अर्जदार क्र. १ ला आणण्यासाठी अनेकवेळा तिच्या माहेरी गेला. परंतु अर्जदार क्र. १ व तिच्या आई–वडीलांनी अर्जदार क्र. १ ला पाठविण्यास नकार दिला आणि उलट गैरअर्जदार क्र. १ ला धमकी दिली की, 'तुला खोटया केसमध्ये गुंतविण'. गैरअर्जदार क्र. १ हा अर्जदार क्र. १ ला आजही सांभाळण्यास तयार आहे. परंतु अर्जदार क्र. १ ने तिचे वागणे सुधारावे अशाप्रकारे वर नमुद कारणांसाठी अर्जदार क्र. १ चा अर्ज नामंजुर करण्याची विनंती गैरअर्जदारांनी केली.

१५. अर्जदारांच्या अर्जातील कथने आणि गैरअर्जदारांच्या म्हणण्यातील कथने यावरून पुढील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थित झाले. सदर मुद्देचे निष्कर्ष मी पुढील नमुद कारणमिमांसेसह देत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | गैरअर्जदार क्र. १ ने अर्जदार क्र. १ वर कौटूंबिक हिंसाचार केला आहे असे अर्जदार क्र. १ ने सिध्द केले आहे काय? | होय. |
| २. | गैरअर्जदार क्र. १ कडून अंतरिम पोटगी म्हणुन रु. १०,०००/– मिळण्यास अर्जदार हे पात्र आहे काय ? | अर्ज दाखल तारखेपासुन प्रत्येकी रु. १,५००/- |
| ३. | गैरअर्जदार क्र. १ कडून अंतरिम नुकसान भरपाई म्हणुन रु. १,००,०००/– मिळण्यास अर्जदार हे पात्र आहे काय ? | रुपये १०,०००/- |
| ४. | गैरअर्जदार क्र. १ कडून अंतरिम घरभाडे म्हणुन रु. ५,०००/– मिळण्यास अर्जदार क्र. १ पात्र आहे काय ? | दरमहा रु. १,०००/- |

| | | |
|---|---|---|
| ५. | गैरअर्जदार क्र. १ कडून अंतरिम वैद्यकीय मदत मिळण्यास अर्जदार क्र. १ पात्र आहे काय ? | नाही. |
| ६. | कोणता आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## <u>कारणमिमांसा</u>

**<u>मुद्दा क्र. १ करीताः</u>–**

१६. अर्जदार क्र. १ ने तिच्या अर्जामध्ये असे कथन केले आहे की, अर्जदार क्र. १ आणि गैरअर्जदार क्र. १ यांचे लग्न १६/०४/२०१६ रोजी झाले. अर्जदार क्र. १ ने तिच्या अर्जातील कथनाच्या समर्थनार्थ तिच्या अर्जासोबत तिच्या आणि गैरअर्जदार क्र. १ च्या लग्नाची पत्रीका दाखल केली आहे. मी सदर लग्नपत्रीकेचे अवलोकन केले. सदर लग्न पत्रीकेमध्ये त्यांच्या लग्नाची तारीख १६/०४/२०१६ अशी लिहीलेली आहे.

१७. अर्जदार क्र. १ ने तिच्या अर्जामध्ये असे कथन केले आहे की, गैरअर्जदार क्र. १ ने लग्नानंतर तिच्यावर कौटुंबिक हिंसाचार केला. अर्जदार क्र. १ ने तिच्या अर्जातील कथनाच्या समर्थनार्थ नि.क्र. ०५ वरील अर्जासोबत स्वतःचे शपथपत्र दाखल केले आहे. सदर शपथपत्रामध्ये गैरअर्जदारांनी अर्जदार क्र. १ वर केलेल्या कौटूंबिक हिसांचाराचे सविस्तर वर्णन नमूद आहे. गैरअर्जदार क्र. १ ने नि.क्र. ११ वर त्याचे म्हणणे दाखल केले आहे. त्याने त्याच्या म्हणण्यामध्ये त्याने अर्जदार क्र. १ वर कौटूंबिक हिंसाचार केला असल्याचे नाकारले आहे.

१८. कोर्टाच्या आदेशाने वरुड येथील महिला व बालविकास विभाग येथील संरक्षण अधिकारी यांचा अहवाल सदर प्रकरणात मागविण्यात आला. सदर संरक्षण

अधिकारी यांनी नि.क्र. ०६ वर त्यांचा कौटूंबिक अहवाल दाखल केला. सदर कौटूंबिक अहवालामध्ये गैरअर्जदारांनी अर्जदार क्र. १ वर केलेल्या कौटूंबिक हिंसाचाराची सविस्तर माहिती नमूद केली आहे. सदर अहवालामध्ये गैरअर्जदारांनी अर्जदार क्र. १ ला शिवीगाळ केल्याचे, मारहाण केल्याचे, घरातुन हाकलून दिल्याचे तसेच माहेरुन रुपये ५० हजार आणण्यासाठी तगादा लावल्याचे नमूद केले आहे.

१९. गैरअर्जदार क्र. १ ने त्याच्या म्हणण्यामध्ये त्याने अर्जदार क्र. १ चा शारिरीक आणि मानसीक छळ केल्याचे आणि तिच्यावर कौटूंबिक हिंसाचार केल्याचे नाकारले आहे.

२०. अशाप्रकारे अर्जदार क्र. १ ने अभिलेखावर दाखल केलेल्या शपथपत्रातील मजकुरावरुन आणि वरुड येथील संरक्षण अधिकारी यांनी अभिलेखावर दाखल केलेल्या त्यांच्या कौटूंबिक घटना अहवालावरुन गैरअर्जदार क्र. १ ने अर्जदार क्र. १ वर कौटूंबिक हिंसाचार केला असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येते. म्हणुन मी मुद्दा क्र. १ चे उत्तर होकारार्थी दर्शवितो.

**मुद्दा क्र. २ करीताः–**

२१. अर्जदार क्र. १ ने तिच्या अर्जामध्ये असे कथन केले आहे की, दि. १८/०८/२०१८ रोजी अर्जदार क्र. १ ही गैरअर्जदार क्र. १ कडे राहण्यसाठी गेली असता गैरअर्जदारांनी तिला घरात घेतले नाही. त्यामुळे अर्जदार क्र. १ ही तिच्या माहेरी राहायला आली आणि तेव्हा पासुन ती तिच्या माहेरी राहत आहे. गैरअर्जदार क्र. १ ने औषोधपाचारासाठी तिला कोणतेही आर्थिक मदत केली नाही. अर्जदाराने तिच्या अर्जातील

कथनाच्या समर्थनार्थ नि.क्र. ०५ वर स्वतःच्या पुराव्याचे शपथपत्र दाखल केले आहे.

२२. गैरअर्जदार क्र. १ ने त्याच्या म्हणण्यामध्ये असे कथन केले आहे की, अर्जदार क्र. १ ने गैरअर्जदार क्र. १ बरोबर येणास नकार दिला. तसेच त्याने त्याच्या म्हणण्यामध्ये असेही कथन केले आहे की, तो अर्जदार क्र. १ ला सांभाळण्यास तयार आहे.

२३. अर्जदाराने तिच्या अर्जामध्ये असे कथन केले आहे की, गैरअर्जदार क्र. १ टॉईल्स फिटींगचे काम करतो त्यापासुन त्याला दरमहा ३० हजार रुपये उत्पन्न मिळते. तसेच त्याच्याकडे १३ एकर जमिन असुन त्याला त्यातुन वार्षीक ५ लाख रुपये उत्पन्न मिळते. तसेच गैरअर्जदारांकडे स्वताःच्या मालकीचे घर आहे. गैरअर्जदार क्र. १ हा टॉईल्स फिटींगचे काम करतो आणि त्यापासुन त्याला दरमहा रुपये ३० हजार मिळतात असे दाखविणारा कोणताही कागदोपत्री पुरावा अर्जदार क्र. १ ने अभिलेखावर दाखल केलेला नाही. गैरअर्जदार क्र. १ च्या मालकीचे घर असल्याचे दाखविणारा कागदोपत्री पुरावा अर्जदार क्र. १ दाखल केला नाही.

२४. गैरअर्जदार क्र. १ ने त्याच्या म्हणण्यामध्ये असे कथन केले आहे की, अर्जदार क्र. १ ही शिलाईचे काम करते आणि तिला दररोज रुपये ३००/– मजुरी मिळते. परंतु गैरअर्जदार क्र. १ ने त्याच्या सदरच्या म्हणण्याच्या समर्थनार्थ कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केला नाही.

२५. अर्जदार क्र. १ ने गैरअर्जदार क्र. १ चे उत्पन्न दाखविण्यासाठी जुनापाणी गावचे खतावणी दाखल केली आहे. मी सदर खतावणीचे अवलोकन केले. सदर खतावणीमध्ये देवसिंग भोम्यालाल पवार यांच्या नावाने गट क्र. २९/१ क्षेत्र. ०.७४८०

आणि गट क्र. २९/०२ क्षेत्र ०.३७५० असे एकुण हेक्टर १.१२३० एवढे क्षेत्र आहे. परंतु अर्जदारांनी त्यांच्या अर्जामध्ये देवसिंग भोम्यालालजी पाठेकर असे नाव नमूद केले आहे. संरक्षण अधिकारी यांनी अभिलेखावर दाखल केलेल्या कौटूंबिक अहवालामध्ये देखील अर्जदार क्र. १ च्या पतीचे नाव देवसिंग भोम्यालालजी पाठेकर असे नमूद केले आहे. तसेच अर्जदाराने अभिलेखावर दाखल केलेल्या लग्नपत्रिकेमध्ये देखील अर्जदाराच्या पतीचे नाव वसिंग भोम्यालालजी पाठेकर असे नमूद आहे. त्यामुळे गैरअर्जदार क्र. १ हा जुनापाणी येथील गट क्र. २९/१ आणि गट क्र. २९/०२ याचा मालक असल्याचे दिसुन येत नाही.

२६. गैरअर्जदार क्र. १ त्याच्या म्हणण्यामध्ये अर्जदारांशी असलेले नाते नाकारलेले नाही. अर्जदार पत्नीचा सांभाळ करणे हे गैरअर्जदार क्र. १ चे प्राथमिक कर्तव्य आहे. अर्जदार ही माहेरी तिच्या आईकडे राहत असल्यामुळे तिला स्वतःच्या आणि तिच्या मुलाच्या प्राथमिक गरजा भागविण्यासाठी पैशाची आवश्यकता असल्याचे दिसुन येते. गैरअर्जदारांनी त्यांच्या म्हणण्यामध्ये अर्जदार ही माहेरी राहत असल्यापासुन तिला आर्थिक मदत केल्याचे नमूद केले नाही. यावरुन गैरअर्जदार क्र. १ ने अर्जदारांना आर्थिक मदत केली नसल्याचे दिसुन येते. अशा परिस्थीतीत अर्जदाराला तिच्या व तिच्या मुलाच्या मुलभुत गरजा भागविण्यासाठी पैशाची आवश्यकता असल्याचे दिसुन येते म्हणून मी मुद्दा क्र. २ चे उत्तर होकारर्थी दर्शवितो.

**<u>मुद्दा क्र. ३ करीता</u>** –

२७. अर्जदाराने त्यांच्या अर्जामध्ये असे कथन केले आहे की, गैरअर्जदारांनी अर्जदार क्र. १ वर कौटूंबिक हिंसाचार केला. अर्जदारांनी अभिलेखात दाखल केलेल्या

शपथपत्रावरुन आणि संरक्षण अधिकारी, महिला व बालविकास विभाग वरुड यांनी दिलेला कौटूंबिक घटना अहवालावरुन गैरअर्जदारांनी अर्जदार क्र. १ वर कौटूंबिक हिंसाचार केला असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येते. अशा परिस्थीतीत गैरअर्जदारांकडून अंतरिम नुकसान भरपाई मिळणे आवश्यक आहे. मी मुद्दा क्र. ३ चे उत्तर होकारर्थी दर्शवितो.

**<u>मुद्दा क्र. ४ करीता</u>** –

२८. अर्जदार क्र. १ ने तिच्या अर्जामध्ये असे कथन केले आहे की, ती सध्या तिच्या माहेरी तिच्या आई–वडीलांकडे तिच्या मुलासह म्हणजेच अर्जदार क्र. २ सह राहत आहे. अर्जदार क्र. १ ने तिच्या म्हणण्याच्या समर्थनार्थ नि.क्र. ०५ वर स्वतःचे शपथपत्र दाखल केले आहे. गैरअर्जदार क्र. १ ने त्याच्या म्हणण्यामध्ये असे कथन केले आहे की, तो अर्जदारांना आणण्यासाठी अर्जदार क्र. १ च्या माहेरी गेला होता परंतु अर्जदार हे त्याच्या सोबत आले नाहीत. यावरुन अर्जदार क्र. १ व २ हे अर्जदार क्र. १ च्या माहेरी राहत असल्याचे दिसुन येते अशा परिस्थीतीत अर्जदार क्र. १ व २ यांना स्वतंत्र राहण्याची व्यवस्था होणे गरजेचे आहे म्हणुन मी मुद्दा क्र.४ चे उत्तर होकारर्थी दर्शवितो.

**<u>मुद्दा क्र. ५ करीता</u>** –

२९. अर्जदाराने तिच्या अर्जामध्ये गैरअर्जदारांकडून तिला वैद्यकीय मदत मिळावी अशी मागणी केली आहे. परंतु अर्जदारांनी त्यांच्या अर्जामध्ये त्यांनी कोणते वैद्यकीय उपचार घेतले आणि ते उपचार कोणत्या दवाखान्यात घेतले याचा उल्लेख अर्जामध्ये केलेला नाही तसेच त्याबाबतचा कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केला नाही. त्यामुळे अर्जदारांची वैद्यकीय मदतीसाठी पैशाची केलेली मागणी मान्य करता येणार नाही. म्हणुन मी मुद्दा क्र.५

चे उत्तर नकारार्थी दर्शवितो.

**मुद्दा क्र. ६ करीता** –

३०. मी मुद्दा क्र. १ ते ५ करीता दिलेली कारणमिमांसा व नोंदविलेले निष्कर्ष या आधारे पुढील आदेश देतो.

## आदेश

१. अर्जदारांचा अर्ज अंशतः मंजुर केला.

२. गैरअर्जदार क्र. १ ने अर्जदार क्र. १ आणि २ यांना अर्ज दाखल तारखेपासून दरमहा प्रत्येकी रु. १,५००/–(रुपये एक हजार पाचशे फक्त्) अंतरिम पोटगी म्हणून दयावेत.

३. गैरअर्जदार क्र. १ ते ३ यांनी ने अर्जदारांना रु. १०,०००/–(रुपये दहा हजार फक्त) अंतरिम नुकसान भरपाई म्हणून दयावेत.

४. गैरअर्जदार क्र. १ ने अर्जदार क्र. १ आणि २ यांना अर्ज दाखल तारखेपासून दरमहा रु. १,०००/–(रुपये एक हजार फक्त) अंतरिम घरभाडे म्हणून दयावेत.

५. अर्जदारांची वैद्यकीय मदतीसाठी केलेली पैशाची मागणी नाकारण्यात येते.

दि. २०/११/२०२१

(एम.एस. लिगाडे )
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
वरूड.